Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0015

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

# महिला सशक्तीकरण

डॉ. बळीराम राऊत (मराठी विभाग)
सहयोगी प्राध्यापक
जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड
जि. नागपूर – Pin No: 4412103
Mob : 9767278720/9356229389
Email : baliramraut37@gmail.com

**सारांशः—**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वातंत्र होऊन ७८ वर्ष पुर्ण झाली. या सात दशकाच्या काळात देशाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक व शैक्षणिक प्रगती बऱ्याच प्रमाणात झाली. अगदी प्राचीन काळापासून पुरूष प्रधान संस्कृतीत परंपरा व रूढीच्या जखळात असलेली स्त्री आत्मनिर्भय होऊ शकली नाही. भारतात लोकसंख्येच्या ५०टक्के प्रमाणात महिला असून त्यांचे कल्याण झाले नाही. त्यांच्यावरील अन्याय अत्याचारविषयक कठोर धोरण व कायदे करून स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी सरकारने पाहुले उचलली. त्याचेच जोतक म्हणून 'चूल—मूल' दृष्टचक्राच्या बाहेर पडून स्त्री शिक्षण घेऊन अनेक क्षेत्रात आपल्या महत्वाकांक्षी अष्टपैलूत्वामुळे आपला ठसा उमटवत आहे. अनेक पुरस्कारांनी ती सन्मानित होऊन पुरूषाबरोबर आपली कर्तव्य पार पाडतांना स्त्रिया दिसत आहेत हे महिला सबलीकरणाची नांदीच म्हणावी लागेल.

**मुख्यशब्दः—** महिला, शिक्षण, कायदे, धोरण, विकास, सशक्तीकरण

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळून आजघडीला ७८ वर्ष पूर्ण होत आहेत. या सात दशकाच्या काळात देशाची सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात प्रगती झाली. आजवर साक्षरता, प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण ह्यांचे प्रमाण निश्चितच वाढले. विविध क्षेत्रात देशाने प्रगती केली असल्याने आजच्या स्थितीत वैद्यकीय सेवांचा शहरापासून ते ग्रामीण भागापर्यंत प्रसार झाल्याने सर्वांचे आयुमान वाढले तरी या विकास प्रक्रियेत उपेक्षित राहिलेली महिला वर्ग प्रगतीची, विकासाची फळे चाखू लागली आहे. जुन्या प्रथा परंपरा रितिरिवाज यांच्या जखडातून महिला बऱ्याचपैकी स्वतंत्र होतांना दिसतात.

घरात गृहिणी म्हणून अडकलेल्या स्त्रीया आता घराबाहेर श्रमकार्यात व्यवसायात सहभागी होतांना दिसत आहेत. त्याचे कारणही तसेच आहे. पुरूषाच्या दास्यत्वात राहणारी पारंपारिक संस्कृतीची पाईक राहिली नाही. स्त्रीच्या सशक्तीकरणासाठी सरकारने केलेले कायदे स्त्री – पुरूष समानता या धोरणामुळे स्त्री आता सक्षम बनु पाहत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वावरणारी चूल मूल सांभाळणारी, पुरूष प्रधान संस्कृतीत स्वतःचा कोंडमारा करून घेणारी स्त्री, व्यक्ती स्वातंत्र्या पासून वंचित असणारी स्त्री शिक्षितपणामुळे तिला तिचे अधिकार व कर्तव्याची जाणीव झाली. शेकडो वर्षापासून स्त्रीच्या उत्थानासाठी पुढे आलेल्या चळवळी समाजसुधारकांनी स्त्री विकासासाठी केलेले प्रयत्न यशस्वी झाले असून स्त्री आता पूर्णतः नाही परंतू बऱ्यापैकी सक्षम होत आहे व ते व्हायला पाहिजे.

कुटुबात, समाजात, राष्ट्रात तिचे स्थान आहे. स्थान म्हणजे दर्जा तिला दर्जाही प्राप्त होतांना दिसतो. त्यामुळेच आज बहुसंख्य स्त्रीया विविध क्षेत्रात विविध क्षेत्रात आपल्या कर्तव्यानुसार दर्जा प्राप्त करत आहे. त्यामागील प्रमुख कारण तिला मिळालेली समानता होय. कुटुंबात समाजात तिचे स्थान महत्वाचे आहे. स्त्रीशिवाय कुटुंब व समाजव्यव्यस्था मुळातच अपुर्ण आहे. अनेक कर्तबगार स्त्रीया आज सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवितांना दिसत आहेत. ज्या स्त्रीयांना समाजात आपले हक्क, अधिकार, कर्तव्यपार पाडण्यास मज्जाव होता. तो समाज आज मुळातच नेस्तनाबूत झालाय. कोणत्याही समाजाचा — राज्य — राष्ट्राचा विकास हा त्या देशातील समता—न्याय तत्वावर होतो. ज्या राष्ट्रांनी स्त्रियांना अधिकार प्रदान केले ते राष्ट्र सुसंस्कृत व पुढारलेले आहेत. सर्वाना ज्ञात आहे आणि म्हणुनच स्त्रीच्या उन्नयनासाठी उशिरा का होईना स्त्री सक्षमी करणासाठी भारतात ही द्रुतगतीने प्रयत्न होतांना दिसताहेत. जी स्त्री कुंटुबातील पुरूषवर्गावर विसंबुन राहत होती आज अनेक स्त्रीया ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत अनेक उद्योग व्यवसायात गुंतलेल्या दिसून येतांना दिसतात आज त्यांचे परिणाम परावलबंनातून सुटायच असेल तर प्रथम आर्थिक दृष्टया सक्षम होणे गरजेचं असते. त्यासाठी महिलांच्या सबलीकरणासाठी 'स्वबचत' गटाची कल्पना पुढे आली. अनेक अर्थसाह्ह्य देणाऱ्या संस्था पुढे आल्या शिवाय सरकारचे महिलासक्षमीकरण धोरणांची जोड मिळाल्याने आज ग्रामीण स्त्रीयांना आर्थिक क्षेत्रात जम बसविला आहे.

महिलांकडे निर्मित क्षमतेची प्रचंड उर्जा आहे. त्या देखील पुरूषाप्रमाणे किंवा त्यापेक्षाही जास्त कार्यक्षम आहेत. त्या देखील पुरूषाप्रमाणे किंवा त्यापेक्षाही जास्त कार्यक्षम आहेत. स्वतःच्या आत्मविश्वासावर अनेक लघुउद्योग, पतसंस्था निर्माण करणे पासून ते मोठ्या उद्योगापर्यंत स्त्रीयांनी मजल मारली आहे. आज भारतात लोकसंख्येच्या प्रमाणात ५०टक्के स्त्रीया आहेत. हा महिला वर्ग उद्योगक्षेत्रात, नोकरी आणि व्यवसायात पुढाकार घेतांना दिसत आहेत. हे समाजपरिवर्तनाचे व राष्ट्रविकास कार्याचे यशस्वी पाहूल आहे. गेल्या पिढीजात, पारंपारिक रूढी—परंपरेत स्त्रीला अडकवून केवळ स्त्रीला दुर्बल म्हणून पाहिले जात होते. या शारिरिक भिन्नतेमुळे स्त्रीयांचा उद्धार आजवर होऊ शकला नाही. स्त्रीयांना मिळालेला समान अधिकार त्यांचे हित आकाशा पाहता आज ज्या व्यवसायात स्त्री कर्तव्य पार पाडतांना दिसतात. त्यांच्या सहकार्याची भावना वाढीस लागलेली आहे. आत्मविश्वास वाढलेला आहे. कोणत्याही क्षेत्रात उद्योग—नोकरी करण्यास सक्षम होत आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे केले. त्यामुळे स्त्रीया समाजाच्या चाकोरी बाहेर येऊन निधास्तपणे कार्यशिल होतांना दिसतात. विवाहविषयक कायदा, संपत्तीत समान वाटा, स्त्री—अत्याचार प्रतिबंध कायदा, स्त्री वारसा हक्क कायदा, हुंडा प्रतिबंध बहुपत्नीत्व कायदा, घटस्फोट कायदा, पालपोषणाचा कायदा, विधवा पुर्नविवाह कायदा, बलात्कार प्रतिबंध कायदा असे अनेक कायदे स्त्रीयांच्या बाजुले उभे असल्यानेच स्त्रिया निर्भयपणे स्वतः विविध क्षेत्रात वावरताना दिसतात. साहित्य, विज्ञान, जागतिक शांतता, अर्थशास्त्र उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात स्त्रीया यामुळेच कामगिरी करू लागल्यात. या त्यांच्या कामगिरीची दखल घेत अनेक क्षेत्रात त्यांचा सन्मानही होतो.

स्यिांनी आपले श्रम कौशल्य, आत्मविश्वास, जिद्द पणाला लावून वैद्यक क्षेत्रात राजकीय क्षेत्रात लौकिक प्राप्त करून आपल्या राज्याच्या आर्थिक उत्पादनात मोलाची कामगीरी बजावतांना दिसतात. महिलांच्या ठिकाणी असणारी अमाप कर्तुत्वशक्ती तमाम मानवजातीच्या कल्याणासाठी कशी उपयोगात

आणता येईल. यादृष्टीने चळवळीने माध्यमातून कायदात्मक बदल करून घेण्यात बरीच मदत झाली. राजकीय, शासकीय पातळीवर स्त्री विकासाच्या योजना व धोरणे तयार करण्यात आली. दारिद्र्य निर्मुलन, बेकारी निर्मुलन, राष्ट्रीय स्वांतत्र्याचा पुरस्कार, जागतिक शांतता आणि राष्ट्रीय एकात्मता इ. प्रश्नाबाबत जनतेचे प्रश्न हे आपलेच आहेत, अशा समज बाळगुन केलेले कार्य स्त्रीच्या सक्षमीकरणाचे गमक आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१) आपटे जं.शं.रोडे पुष्पा — भारतातील महिला विकासाची वाटचाल.
२) देशमुख डॉ. अलका — विविधांगी आयामातून स्त्री.
३) मेहेत्रे — डॉ स्मिता — भारतीय स्त्री आणि मानवाधिकार.
४) रोडे पुष्पा — महिलांसाठी आधार कायद्याचा.
५) माहेश्वरी अविनाश — महिला अधिकार व कानून